www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

**B**

# Paper-II
# GEOGRAPHY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ..............................................

2. (Signature) ........................................

(Name) ..............................................

Seat No. [ ] (In figures as in Admit Card)

Seat No. ........................................................... (In words)

OMR Sheet No. [ ] (To be filled by the Candidate)

**MAY - 36216**

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **50** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

MAY - 36216/II—B

# Geography
## Paper II
# भूगोल
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This paper contains **50** multiple choice questions, each carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण **50** बहुपर्यायी प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Which of the urban form models focuses on transportation arterials ?
   (A) Sector model
   (B) Concentric model
   (C) Peripheral model
   (D) Multiple nuclei model

2. Global population witnessed accelerated increase approximately 200 years back due to :
   (A) Green Revolution
   (B) Agricultural Revolution
   (C) Industrial Revolution
   (D) Medical Revolution

1. वाहतूक वाहिन्या केंद्रित नागरी आकार प्रारूप कोणते ?
   (A) त्रिज्याखंड प्रारूप
   (B) संकेंद्रीय प्रारूप
   (C) परिधीय प्रारूप
   (D) बहुकेंद्रीय प्रारूप

2. सुमारे 200 वर्षापूर्वी, जागतिक लोकसंख्या वेगवान वाढीच्या अनुभूतीचे कारण ........... .
   (A) हरित क्रांती
   (B) कृषी क्रांती
   (C) औद्योगिक क्रांती
   (D) वैद्यकीय क्रांती

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



3. According to Central Place theory of settlements, hierarchy is conceived as a systematic arrangement of the settlements on the basis of .................. .

(A) Functional interlinkages

(B) Size of the service areas

(C) Size of threshold population, range of the function and nodality

(D) Flow of goods, services and information

4. A suburb is :

(A) an outer commutating zone of an urban area

(B) associated with social homogeneity and a life style suited to family needs

(C) the spread and growth of cities

(D) both (A) and (B)

3. वस्ती अभ्यासातील केंद्रीय स्थान सिद्धांतानुसार श्रेणीबंध म्हणजे .............................. च्या आधारावर वस्तीची पद्धतशीर रचना होय.

(A) कार्यात्मकदृष्ट्या परस्परांत जोडणी

(B) सेवा क्षेत्राचे आकारमान

(C) अध:सीमा लोकसंख्येचे आकारमान, कार्याची कक्षा व एककेंद्रितता

(D) वस्तू, सेवा व माहिती यांचा ओघ

4. उपनगर म्हणजे .............................. .

(A) एखाद्या नागरीक्षेत्राच्या बाह्य दिक्परिवर्ती विभाग

(B) सामाजिक समांगताशी संबंधित व कुटुंबाच्या सुसंगत जीवनपद्धती

(C) शहरांची विस्तार व वाढ

(D) दोन्ही (A) व (B)

5. Find out the correct descending sequence of continents on the basis of crude birth rate :
   (A) Africa, Asia, Latin America, Europe
   (B) Africa, Latin America, Asia, Europe
   (C) Latin America, Africa, Asia, Europe
   (D) Europe, Latin America, Africa, Asia

6. The Brazilian plateau is rich in :
   (A) Petroleum
   (B) Iron ore
   (C) Nickel
   (D) Copper

7. The model of agricultural location given by Von Thunen is based on ...................... technique.
   (A) Normative
   (B) Empirical
   (C) Multi-element
   (D) Single element

5. खंडाचा ढोबळ जन्मदरानुसार योग्य उतरता क्रम ओळखा :
   (A) आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिका, यूरोप
   (B) आफ्रिका, लॅटिन अमेरिका, आशिया, यूरोप
   (C) लॅटिन अमेरिका, आफ्रिका, आशिया, यूरोप
   (D) यूरोप, लॅटिन अमेरिका, आफ्रिका, आशिया

6. ................................... यात ब्राझिलियन पठार समृद्ध आहे.
   (A) पेट्रोलियम
   (B) लोह खनिज
   (C) निकेल
   (D) तांबे

7. व्हॉन थ्युनेन यांनी मांडलेले कृषिस्थान प्रारूप .............................. तंत्रावर आधारलेले आहे.
   (A) प्रमाणक
   (B) आनुभविक
   (C) बहुघटक
   (D) एक–घटक

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



8. A topological graph of the transport network neither related to ................ nor direction.
   (A) Index
   (B) Scale
   (C) Flow
   (D) Axis

9. Which of the following is *not* a foot loosing industry ?
   (A) Iron and steel industry
   (B) Sugar industry
   (C) Cotton textile industry
   (D) Rice milling industry

10. Two malls X and Y having equal market attraction are equidistant in kilometers but reachable in 15 and 25 minutes on feet, respectively. Suresh's decision to visit mall X would therefore illustrate the principle of ...................... .
   (A) Distance decay
   (B) Profit maximization
   (C) Economic rationality
   (D) Clientele loyalty

8. वाहतूक जाळीचा सांस्थितिक आलेख ना ............................ शी, ना दिशेशी संबंधित असतो.
   (A) सूची
   (B) प्रमाण
   (C) प्रवाह
   (D) अक्ष

9. खालीलपैकी कोणता पदभ्रष्ट उद्योग **नाही** ?
   (A) लोह व पोलाद उद्योग
   (B) साखर उद्योग
   (C) सुती कापड उद्योग
   (D) भातसरणी उद्योग

10. बाजारपेठेत समान आकर्षण असणारे X व Y हे दोन मॉल किलोमीटरमध्ये समान अंतरावर आहेत, परंतू पायी जाण्यास अनुक्रमे 15 व 25 मिनिटे लागतात. सुरेशचा X मॉलला भेट देण्याचा निर्णय ............................ तत्त्व स्पष्ट करते.
   (A) अंतरक्षय
   (B) नफ्याचे महत्तमीकरण
   (C) आर्थिक विवेकीकरण
   (D) ग्राहक एकनिष्ठता

11. Overpopulation is equated with :

(A) the first stage of the demographic cycle with high fertility rates

(B) areas of high birth rates

(C) areas of imbalanced fertility rates and dependency ratios

(D) with a continuing imbalance between the numbers of people and carrying capacity of the land

12. Mac Mahon line, which was decided between the British and the Tibeteans as the boundary between India and Tibet passes through :

(A) Purvanchal Himalayas

(B) Nepal and Sikkim Himalayas

(C) Kumaun Himalayas

(D) Kashmir Himalayas

11. अत्यधिक लोकसंख्या म्हणजे ............... .

(A) लोकसंख्या चक्राच्या पहिल्या अवस्थेत कमाल जननदर स्थिती

(B) उच्च जन्मदर क्षेत्र

(C) असंतुलित जननदर व अवलंबिता दर क्षेत्र

(D) लोकांची संख्या व जमिनीची धारणक्षमता यातील नियमित असंतुलन

12. भारत व तिबेटमधील सीमा म्हणून ब्रिटीश व तिबेटींनी ठरवलेली मॅकमोहन रेषा ............... मधून जाते.

(A) पूर्वांचल हिमालय

(B) नेपाळ आणि सिक्कीम हिमालय

(C) कुमाऊं हिमालय

(D) काश्मिर हिमालय

www.prepp.in



13. Which of the following is *not* an indicator of the cultural landscape ?

(A) Housetype

(B) Kinship

(C) Size of Settlements

(D) Transport

14. Genetic classification of boundaries was proposed by .................... .

(A) Ritter

(B) Hettner

(C) Hartshorne

(D) Ratzel

15. The Khasis of Meghalaya Plateau speak a language that is classified under :

(A) Mon-Khner group of language

(B) Indo-Aryan Family of languages

(C) Dravidian Family of languages

(D) Sino-Tibetan Family of languages

13. खालीलपैकी कोणता सांस्कृतिक भूदृश्याचा दर्शक नाही ?

(A) घरांचे प्रकार

(B) नातेसंबंध

(C) वसाहतीचे आकार

(D) वाहतूक

14. सीमांचे जननिक वर्गीकरण ..................... यांनी प्रतिपादीत केले.

(A) रीटर

(B) हेटनर

(C) हार्टशॉर्न

(D) रॅटझेल

15. मेघालय पठारावरील लोकं खासी बोलत असलेल्या भाषेचे वर्गीकरण खालीलपैकी कशात होते ?

(A) मॉन-खनेर भाषा समुह

(B) इंडो-आर्यन भाषा कुटुंब

(C) द्रविडीयन भाषा कुटुंब

(D) सिनो-तिबेटीयन भाषा कुटुंब

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



16. Who among the following gave spatial perspective to growth pole theory ?

(A) Francis Perroux

(B) Walter Isard

(C) M.N. Pal

(D) Boudeville

17. An area delineated on the basis of general similarity of land characteristics and occupancy is called as :

(A) Space

(B) Landscape

(C) Region

(D) Area

18. The division of India into administrative states, districts and blocks etcetra for development planning is called .................. .

(A) Sectoral development

(B) Multilevel planning

(C) Micro-level planning

(D) Area planning

16. वृद्धी धृव सिद्धान्तास अभिक्षेत्रीय आयाम खालीलपैकी कोणी दिला ?

(A) फ्रान्सिस पॅरॉक्स

(B) वॉल्टर इझार्ड

(C) एम.एन. पाल

(D) बाऊडव्हिले

17. साधारण भूमि वैशिष्ट्यांचा सारखेपणा व वापर याआधारे निश्‍चित केलेल्या क्षेत्रास .................... म्हणतात.

(A) अवकाश

(B) भूदृश्य

(C) प्रदेश

(D) क्षेत्र

18. भारताच्या विकास नियोजनासाठी प्रशासकीय राज्ये, जिल्हे व गट इत्यादी मध्ये केलेल्या विभाजनास ......................... असे म्हणतात.

(A) विभागीय विकास

(B) बहुपातळी नियोजन

(C) सुक्ष्म पातळी नियोजन

(D) क्षेत्र नियोजन

www.prepp.in



19. The regional disparities can be narrowed down over a time when ............... .

    (A) it is ensured that the rate of development of the backward areas is greater than the rate of development of other areas

    (B) Preference is given to most developed areas

    (C) Emphasized for equal weightage to all regions

    (D) Allocation of less grants to lagging areas

20. The minimum sales volume needed to support a business is called :

    (A) Range

    (B) Core

    (C) Threshold

    (D) Optimum business benefit

19. प्रादेशिक विषमता कालान्तराने कमी होऊ शकते जेव्हा ................................ .

    (A) मागास भागातील विकास दर हा इतर भागाच्या विकास दरापेक्षा जास्त असल्याची खात्री होते

    (B) अति विकसीत भागास प्राधान्य मिळते

    (C) सर्व प्रदेशास समान भार देण्यावर भर मिळतो

    (D) पिछाडलेल्या प्रदेशास अनुदानाचा कमी वाटा मिळतो

20. व्यवसायास आधार देण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान विक्रीच्या आकारामानास ............................ असे म्हणतात.

    (A) कक्षा

    (B) गाभा

    (C) अधःसीमा

    (D) पर्याप्त व्यावसायिक लाभ

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



21. Kamet peak lies closer to which of the following glacier ?

(A) Gangotri

(B) Pindari

(C) Siachin

(D) Rimo

22. Which of the following statement is *not* correct ?

(A) The Himalayan ranges act as a barrier to the cold winds blowing down from Central Asia

(B) Himalayan ranges acted as a barrier to the free movement of people in the past

(C) The Himalayan ranges are a large storehouse of marine fossils

(D) The Himalayan ranges were formed during Hercynian Orogeny

21. कामेत शिखर खालीलपैकी कोणत्या हिमनदीच्या नजीक आहे ?

(A) गंगोत्री

(B) पिंडारी

(C) सियाचीन

(D) रिमो

22. खालीलपैकी कोणते विधान बरोबर **नाही** ?

(A) हिमालयाच्या रांगा मध्य आशियातून येणाऱ्या थंड वाऱ्यांना अडथळा बनतात

(B) भूतकाळात हिमालयाच्या रांगा लोकांच्या मुक्त संचारास अडथळा बनल्या होत्या

(C) हिमालयाच्या रांगा सागरी अवशेषांचे मोठे भांडार आहेत

(D) हिमालय रांगांची निर्मिती हर्सेनियन गिरीजननादरम्यान झाली

prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in



23. Tamil Nadu receives much of its rainfall through the .................. .

(A) South-West Monsoon

(B) Western Disturbances

(C) North-East Monsoon

(D) Tropical Cyclones

24. Consider the following statements :

(*a*) Inundation canals are taken out from rivers without building any kind of weir

(*b*) Irrigation by this kind of canals is more than canal drawn from irrigation dams.

Which of the above statement(s) is/are *correct* ?

(A) Only (*a*)

(B) Only (*b*)

(C) Both (*a*) and (*b*)

(D) Neither (*a*) nor (*b*)

23. तामीळनाडूत बराचसा पर्जन्य .................... मुळे पडतो.

(A) नैर्ऋत्य मान्सून

(B) पश्चिमी विक्षोभ

(C) इशान्य मान्सून

(D) उष्णकटिबंधीय आवर्त

24. खालील विधानांचा विचार करा :

(*a*) पूरवाहक कालवे नदीला कोणत्याही प्रकारचा बंधारा बांधल्याशिवाय नदीपासून बाहेर काढलेले असतात

(*b*) अशा प्रकारच्या कालव्याद्वारे होणारे जलसिंचन धरणाच्या कालव्यांपेक्षा अधिक असते

वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(A) फक्त (*a*)

(B) फक्त (*b*)

(C) (*a*) व (*b*) दोन्ही

(D) (*a*) किंवा (*b*) पैकी कोणतेच नाही

25. Sequentially, in terms of cotton cultivation top three states are ........ .
    (A) Gujrat — Maharashtra — Andhra Pradesh
    (B) Andhra Pradesh — Gujrat — Maharashtra
    (C) Maharashtra — Andhra Pradesh — Gujrat
    (D) Maharashtra — Gujrat — Andhra Pradesh

26. Population density map uses ................ type of data.
    (A) Nominal
    (B) Hierarchical
    (C) Differentiated
    (D) Ratio

27. If the universe has heterogenous composition, a ...................... sampling is preferred.
    (A) Systematic linear
    (B) Stratified random
    (C) Systematic block
    (D) Random grid

25. कापूस लागवडी संदर्भात तीन अग्रणी राज्यांचा अनुक्रम असा आहे.
    (A) गुजरात—महाराष्ट्र—आंध्र प्रदेश
    (B) आंध्र प्रदेश—गुजरात—महाराष्ट्र
    (C) महाराष्ट्र—आंध्र प्रदेश—गुजरात
    (D) महाराष्ट्र—गुजरात—आंध्र प्रदेश

26. लोकसंख्या घनता नकाशासाठी ................ प्रकारची सामग्री वापरतात.
    (A) नामदर्शक
    (B) श्रेणीदर्शक
    (C) भेदित
    (D) गुणोत्तर

27. समष्टीची रचना जर बहुजिनसी असेल तर ............................ प्रतिचयन पद्धतीस प्राधान्य दिले जाते.
    (A) क्रमबद्ध रेषीय
    (B) स्तरीय यादृच्छिक
    (C) क्रमबद्ध खंडीय
    (D) यादृच्छिक जाळीय

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



28. Basic aim of a thematic map is ...................... .
    (A) To show distribution of variable(s)
    (B) To analyse the spatial pattern that emerge
    (C) To show numeric information in visual form
    (D) To show what exists and where it exists

29. Which of the following is *not* a measure of dispersion ?
    (A) Quartile deviation
    (B) Variance
    (C) Standard deviation
    (D) Standard score

30. The spatial resolution of LISS 1 senser was .................. .
    (A) 165 m
    (B) 30 m
    (C) 72.5 m
    (D) 5 m

28. खालीलपैकी कोणते उद्देश्यात्मक नकाशांचे मुख्य ध्येय असेल ?
    (A) एखाद्या चलाचे वितरण दर्शविणे
    (B) निर्माण होणाऱ्या क्षेत्रीय आकृतिबंधाचे विश्लेषण करणे
    (C) सांख्यिकी माहिती दृश्य स्वरूपात दर्शविणे
    (D) काय आहे व ते कोठे आहे ते दर्शविणे

29. खालीलपैकी कोणते अपस्करणाचे परिणाम नाही ?
    (A) चतुर्थक विचलन
    (B) प्रचरण
    (C) प्रमाणित विचलन
    (D) प्रमाणित मूल्य

30. LISS 1 या संवेदकाचे क्षेत्रीय विभेदन ........................... मीटर होते.
    (A) 165
    (B) 30
    (C) 72.5
    (D) 5

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



31. A pair of Geomorphologist that contributed to the concept of base level of erosion is :

(A) A. Penk and W.M. Davis

(B) G.K. Gilbert and G.E. Dutton

(C) Lyell and Ramsey

(D) Powell and Greenwood

32. Which of the following is *not* a form of chemical weathering ?

(A) Chelation

(B) Oxidation

(C) Carbonation

(D) Corrosion

31. भूरूपशास्त्रज्ञांच्या ज्या जोडीने अपक्षरणाची आधारभूत पातळी संकल्पना मांडली ते म्हणजे :

(A) ए. पेन्क आणि डब्लू.एम. डेव्हीस

(B) जी.के. गीलबर्ट व जी.इ. डटन

(C) लायल आणि रॅमसे

(D) पॉवेल आणि ग्रीनवूड

32. खालीलपैकी कोणता रासायनिक विदारणाचा प्रकार **नाही** ?

(A) चिलेशन

(B) भस्मीकरण

(C) कार्बनीकरण

(D) कोरॅजन

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



33. Transverse faults along the plate boundaries indicate .................... .

(A) subsidence of both the plates

(B) subsidence of the higher plate

(C) absense of vertical displacement

(D) uplift of both the plates along plate boundaries

34. Identify the pair of landforms produced by the glacial deposition :

(A) Cirques and Aretes

(B) Mattern Horn and Roche Montane

(C) Eskers and Kames

(D) Sawtooth Ridges and Tarn

35. Which of the following is *not* a result of endogenic forces ?

(A) Graben

(B) Horst

(C) Residual Mountain

(D) Rift Valley

33. भूपट्टांच्या सीमेवरील अनुप्रस्थ (transverse) भ्रंश ..................... सुचित करतात.

(A) दोन्ही भूपट्टांचे अधोगमन

(B) मोठ्या भूपट्टाचे अधोगमन

(C) उर्ध्वदिशेतील विस्थापनाचा अभाव

(D) सीमेवरील दोन्ही भूपट्टांचे उत्थान

34. हिमनदीच्या संचयन कार्यामुळे तयार होणाऱ्या भूरूपांची जोडी ओळखा :

(A) हिमगव्हर आणि धारदारकडे

(B) गिरीशृंग आणि मेषशीला

(C) एस्कर आणि केम

(D) करवत दंती डोंगररांगा आणि पर्वतातील सरोवर

35. खालीलपैकी कोणता अंतर्गत बलाचा परिणाम **नाही** ?

(A) ग्रॅबन

(B) हॉर्स्ट

(C) अवशिष्ट पर्वत

(D) खचदरी

36. In which of the following types of precipitation the size of drop is less than 0.5 millimeter ?

(A) Rain

(B) Drizzle

(C) Hail

(D) Snow

37. Mid latitudinal cyclones develop in conjunction with the .................. .

(A) Polar Front

(B) Meritime Front

(C) Tropical Front

(D) Equatorial Front

38. Climate, where evaporation exceeds precipitation and there is constant water deficiency is designated by Koppen as ........................ types of climate.

(A) C

(B) A

(C) B

(D) D

36. खालीलपैकी कोणत्या वृष्टी प्रकारात थेंबाचा व्यास 0.5 मिलीमीटरपेक्षा कमी असतो ?

(A) पर्जन्य

(B) तुषार

(C) गारा

(D) हिम

37. मध्य अक्षवृत्तीय आवर्ताचा विकास ........... शी जोडलेला आहे.

(A) ध्रुवीय आघाडी

(B) सागरी आघाडी

(C) उष्णकटीबंधीय आघाडी

(D) विषुववृत्तीय आघाडी

38. असे हवामान की जेथे बाष्पीभवन वृष्टीपेक्षा जास्त असते आणि सतत पाण्याची कमतरता जाणवते त्यास कोपेनने ............................ प्रकारचे हवामान असे निर्धारित केले आहे.

(A) C

(B) A

(C) B

(D) D

www.prepp.in

Your Personal Exams Guide



39. The rate at which temperature of a rising and expanding air parcel decreases is called the .................. .

(A) Environmental Lapse Rate

(B) Adiabatic Lapse Rate

(C) Normal Lapse Rate

(D) Katabatic Lapse Rate

40. Reflection of a substance, expressed as percentage of incident radiation reflected is :

(A) Advection

(B) Aerovane

(C) Albedo

(D) Azores

39. वर जाणाऱ्या आणि प्रसरण पावणाऱ्या वायुपुंज (Air parcel) चे तापमान ज्या दराने कमी होते त्यास .......................... म्हणतात.

(A) पर्यावरणीय लोपदर

(B) आंतरिक (ॲडीएबॅटीक) लोपदर

(C) सरासरी लोपदर

(D) कॅटाबॅटीक लोपदर

40. पदार्थाकडून होणाऱ्या आपाती प्रारणाचे परावर्तनाची टक्केवारी म्हणजे ..................... होय.

(A) ॲडव्हेक्शन

(B) अेरोव्हेन

(C) अलबेडो

(D) अझोरस्

www.prepp.in



41. In terms of geographical extent the ocean deposits which has the largest coverage is ............................ deposits.

(A) Calcareous

(B) Globigerina

(C) Redclay

(D) Radiolarian

42. Which one of the following seas *does not* have land boundaries ?

(A) Red Sea

(B) Adriatic Sea

(C) Sargasso Sea

(D) Aegean Sea

41. भौगोलिक विस्तारानुसार सर्वात विस्तृत व्याप्ती क्षेत्र ......................... या निक्षेपाचे आहे.

(A) चुनामय

(B) ग्लोबिजेरिना

(C) रेडक्ले

(D) रेडिओलेरिअन

42. खालीलपैकी कोणत्या समुद्रास भूसीमा नाहीत ?

(A) तांबडा समुद्र

(B) ॲड्रियाटिक समुद्र

(C) सारगॅसो समुद्र

(D) ॲजियन समुद्र

www.prepp.in



43. ...................... of the wave is determined by dividing the length of a wave by the period.

(A) Velocity

(B) Frequency

(C) Fetch

(D) Amplitude

44. Lists of local winds (List I) and their associated regions (List II) are given. Match the List I with List II and select the *correct* answer from the codes given below :

| List I | List II |
|---|---|
| (*a*) Chinook | (1) Spain |
| (*b*) Mistral | (2) Russia |
| (*c*) Solano | (3) North America |
| (*d*) Burran | (4) South France |

*Codes* :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (4) | (1) | (2) |
| (B) | (3) | (2) | (1) | (4) |
| (C) | (4) | (1) | (2) | (3) |
| (D) | (2) | (3) | (4) | (1) |

43. लहरीचा ......................... तरंग लांबीला आवर्तकाळाने भागून निश्चित करतात.

(A) प्रवेग

(B) वारंवारता

(C) दोलविस्तार

(D) तरंग परास

44. स्थानिक वारे (List I) व त्यांच्याशी निगडीत प्रदेश (List II) दिलेले आहेत. List I व List II यांच्या जोड्या जुळवून खालील दिलेल्या संकेतांकातून योग्य पर्याय निवडा :

| List I | List II |
|---|---|
| (*a*) चिनुक | (1) स्पेन |
| (*b*) मिस्ट्रल | (2) रशिया |
| (*c*) सोलानो | (3) उत्तर अमेरीका |
| (*d*) बुरान | (4) दक्षिण फ्रांस |

**सांकेतांक** :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (4) | (1) | (2) |
| (B) | (3) | (2) | (1) | (4) |
| (C) | (4) | (1) | (2) | (3) |
| (D) | (2) | (3) | (4) | (1) |

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



45. **Assertion (A) :**

A great proportion of the residual wilderness of India is now under great threat.

**Reason (R) :**

Intensive forms of agricultural and industrial growth lead to shrinking of biodiversity.

Select the *correct* answer from the codes given below :

*Codes* :

(A) Both (A) and (R) true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

45. **प्रतिपादन (A) :**

भारतातील उर्वरित वन्यजैविकता (wilderness) बहुतांशी धोक्यात आहे.

**कारण (R) :**

सखोल कृषिप्रकार व औद्योगिक वृद्धी जैविकविविधता आकुंचन पावण्यास कारणीभूत ठरतात.

खाली दिलेल्या संकेतांकातून **योग्य** उत्तर निवडा :

**संकेतांक** :

(A) दोन्ही (A) व (R) बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(B) दोन्ही (A) व (R) बरोबर आहेत पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे, पण (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे, पण (R) हे बरोबर आहे

www.prepp.in



46. Match the List I and List II and select the *correct* answer from the codes given below :

| List I | List II |
|---|---|
| (*a*) Alexander von Humboldt | (1) Anthropo Geography |
| (*b*) Carl Ritter | (2) Geographic Humane |
| (*c*) Friedrich Ratzel | (3) Cosmos |
| (*d*) Jean Brunches | (4) Europe |

*Codes* :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (2) | (4) | (1) |
| (B) | (3) | (4) | (1) | (2) |
| (C) | (2) | (1) | (4) | (3) |
| (D) | (1) | (3) | (4) | (2) |

47. Hartshorne's several articles and finally the book — "Perspective on the Nature of Geography" was written in reaction to the work of ...................... .

(A) Ackerman

(B) Haggett

(C) Sauer

(D) Schaefer

46. सूची I व सूची II यांच्या जोड्या जुळवताना खाली दिलेल्या संकेतांकामधून योग्य पर्याय निवडा :

| सूची I | सूची II |
|---|---|
| (*a*) अलेक्झांडर व्हॉन हुम्बोल्ट | (1) मानववंश भूगोल |
| (*b*) कार्ल रिटर | (2) मानवी भूगोल |
| (*c*) फ्रेडरिक रॅटझेल | (3) कॉसमॉस |
| (*d*) जीन ब्रुन्स | (4) युरोप |

**सांकेतांक** :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (3) | (2) | (4) | (1) |
| (B) | (3) | (4) | (1) | (2) |
| (C) | (2) | (1) | (4) | (3) |
| (D) | (1) | (3) | (4) | (2) |

47. हार्टशॉर्नचे अनेक लेख व अंततः पुस्तक ''भूगोलाच्या स्वरूपाचे यथार्थ दर्शन'' हे ...................... यांच्या कार्यावरच्या प्रतिक्रियेतून लेखन झाले आहे.

(A) ॲकरमन

(B) हॅगेट

(C) साउर

(D) शेफर

www.prepp.in



48. The 1960's approach of geography as spatial science was identified with language and method of :

(A) Ecosystem

(B) Environment

(C) Geometry

(D) Landscape

49. Who among the following remarked : "We must ask the earth herself for her laws."

(A) Humboldt

(B) Ritter

(C) Ratzel

(D) W.M. Davis

50. In 1970s the ...................... school approach emerged as a strong critique of spatial organisation paradigm in Human Geography.

(A) Regional

(B) Welfare

(C) Areal Differentiation

(D) Locational

48. 1960 मध्ये अभिक्षेत्रीय विज्ञान असा भूगोलाचा दृष्टीकोन, भाषा व .............................. पद्धती यासह ओळखला जात होता.

(A) परिसंस्था

(B) पर्यावरण

(C) भूमितीय

(D) भूदृश्य

49. निम्नलिखितांपैकी कोणी पुढील टिप्पणी केली ? आपण पृथ्वीलाच तिच्या कायद्यां बाबतची पृच्छा केली पाहिजे.

(A) हंबोल्ट

(B) रिटर

(C) रॅटझेल

(D) डब्ल्यू. एम. डेव्हिस

50. 1970 च्या दशकात .............................. विचारधारा मानवी भूगोलातील अभिक्षेत्रीय संघटन रूपावलीची सशक्त समीक्षा म्हणून उदयास आली.

(A) प्रादेशिक

(B) कल्याणकारी

(C) क्षेत्रीय विभेदन

(D) स्थानीयता

www.prepp.in



ROUGH WORK

Your Personal Exam Guide

www.prepp.in